सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
**पोलीस अधीक्षक कार्यालय ,**
**यवतमाळ**
एल. आय. सी. चौक, यवतमाळ.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

Email IDsp.yavatmal@mahapolice.gov.in
दुरध्वनी क्र. ०७२३२ २५६७०१

जा.क्र. — पोअय/२०२५/ यवतमाळ.
दिनांक - दि. 25/02/2025

## प्रेसनोट

## दारव्हा पोलीस स्टेशनच्या पुढाकाराने राबविला अनोखा उपक्रम अल्प दरात नागरीकांना उपलब्ध करुन दिले शुध्द व थंड पाणी (वॉटर ए.टी.एम.चे माध्यमातुन)

वाढत्या उन्हयाच्या कडाक्यामुळे दारव्हा तालुक्यात व शहरात पाण्यासाठी नागरीकांची जिवाची लाहीलाही होत आहे. अशा वेळी दारव्हा पोलीस स्टेशनच्या आवारात कित्येक वर्षापासुन बंद पडलेल्या वॉटर ए.टी.एम.ची दुरुस्ती, पोलीस स्टेशनच्या परिसराची रंगरंगोटी दारव्हा पोलीस स्टेशनचे अधिकारी व कर्मचारी यांचे आर्थिक सहभागातुन करण्यात आली. नागरीकांसाठी अवघ्या पाच रुपयात विस लिटर शुध्द व थंड पाणी उपलब्ध करुन देण्यात आले आहे. याच बरोबर पोलीस स्टेशनचा परिसर स्वच्छ करुन नागरीकांसाठी बसण्यासाठी ओटा, झाडांना रंगरंगोटी तसेच पर्यावरण संवर्धणासाठी पोलीस स्टेशनचे आवारातील प्रत्येक झाडाला संदेश देणारे फलक लावण्यात आले आहेत. यासोबतच नागरिकांना तत्पर सेवा पुरविण्यासाठी दारव्हा पोलीस स्टेशनचे अधिकारी व सर्व अंमलदार मेहनत घेत आहेत. यामुळे पोलीस स्टेशनचा परिसर अतिशय सुंदर, निसर्गरम्य व आल्हाददायक असा बनला आहे. यामुळे दिवसभर पोलीस स्टेशन परिसरात पशु पक्षांची रेलचेल दिसुन येत आहे. पक्षाच्या कीलबीलाटाने पोलीस स्टेशनचा वातावरणात वेगळीच प्रसन्नता निर्माण झालेली आहे.

या वॉटर ए.टी.एम.चा छोटेखानी लोकार्पन सोहळा मा. पोलीस अधिक्षक श्री. कुमार चिंता साहेब, मा. अप्पर पोलीस अधिक्षक श्री. पियुष जगताप साहेब, यांचे मोलाचे मार्गदर्शनात आज दिनांक 25 फेब्रुवारी 2025 सकाळी मा. चिलुमुल्ला रजनीकांत सहाय्यक पोलीस अधिक्षक दारव्हा, यांचे हस्ते व मा. रवि काळे तहसिलदार दारव्हा, मा. राजीव शिंदे गटविकास अधिकारी दारव्हा, विलास कुलकर्णी पोलीस निरीक्षक दारव्हा, तसेच शहरातील प्रतिष्ठीत नागरीक, पत्रकार बांधव, पोलीस स्टेशनचे अधिकारी व अंमलदार यांचे उपस्थितीत पार पडला.

यवतमाळ जिल्हा पोलीस दल व दारव्हा पोलीस स्टेशनच्या या उपक्रमाचे सर्व सामान्य नागरिकांनी स्वागत व कौतुक केले असुन कडक उन्हयामध्ये नागरीकासाठी अल्पदरात शुध्द व थंड पाणी उपलब्ध करुन दिल्याबद्दल नागरिकांनी आभार व्यक्त केले आहेत.

शुभांगी रामभाउजी गुल्हाने
जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय,यवतमाळ

Scanned with OKEN Scanner